# आधुनिक भारताचे पितामह : दादाभाई नौरोजी (इ.स. १८२५ ते १९१७)

**प्रा.डॉ.सौ.अरुणा रविंद्र वाघोले,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख,
मा.बाळासाहेब जाधव क. वा. वि. महाविदयालय, आळे, ता.जुन्नर, जि. पुणे. aruna.123w@gmail.com

---

**प्रास्ताविक:**

भारतीय स्वातंत्र्य लढयात विविध सामाजिक विविध समाजसुधारक, नेते, पुढारी यांनी विविध मार्गाद्वारे स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात आहुती दिली. त्यापैकी पितामह दादाभाई नौरोजी यांनी भारताची 'आर्थिक लूट' कशी होते याबाबत भूमिका बजावली.

त्यांनी आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. भारताच्या दारिद्र्याचे शास्त्रीय विश्लेषण करून उपाय सुचविला. त्यांनी आर्थिक दौर्बल्य व राजकीय अन्यायाविरुद्ध लढा दिला. म्हणून त्यांना भारतीय राष्ट्रवादाचे आद्यप्रवर्तकही म्हणतात. त्यांनी ब्रिटिश सरकारवर टीका करण्यास मागेपुढे पाहिले नाही. त्यांच्या महान कार्यामुळेच त्यांच्या समकालीन सहकाऱ्यांनी त्यांना 'आधुनिक भारताचे पितामह' ही उपाधी दिली. तर लोकमान्य टिळक यांनी 'महर्षी' ही पदवी दिली. जेव्हा ८१ वा जन्मदिन मुंबई साजरा करण्यात आला, त्यावेळी गोपाल कृष्ण गोखले यांनी आपल्या भाषणात त्यांचे मधुर पावित्र्य, साधेपणा, सहनशीलता, उदार आत्मविस्मृती, उच्च देशाभिमान आणि देशासाठी त्यांनी घेतलेले कष्ट या गोष्टींचा उल्लेख करून त्यांचा आदर सन्मान केला. असे ही दादाभाई मवाळ आणि जहालाचे श्रद्धेय होते.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत आणि जडणघडणीत महाराष्ट्राचा सर्वाधिक सहभाग होता. इ.स. १८८५ ते इ.स. १९०५ पर्यंतचा राष्ट्रीय काँग्रेसचा कालखंड हा मावळांचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या काळात मवाळांचे नेतृत्व न्यायमूर्ती म.गो. रानडे, नामदार गोपाळ कृष्ण गोखले, फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, उमेशचंद्र बॅनर्जी आणि कॉटन आणि ॲलन ऑक्टोव्हियम ह्युम यांनी केले. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत व जडणघडणीत दादाभाई नौरोजींचे योगदान मोठे आहे. भारताचे आर्थिक शोषण कोणकोणत्या मार्गाने होते, याबाबत विविध बुद्धिवंत विचारवंतांनी वेळोवेळी आपली मते सादर केली आहे. दादाभाईंनी ब्रिटिशांकडून भारतीयांच्या होत असलेल्या आर्थिक शोषणाचा अभ्यास केला व त्याबाबत 'आर्थिक निस्सारनाचा सिद्धांत (Economic Drain Theory)' मांडला. भारतातून स्वस्तात माल इंग्लंडमध्ये नेऊन, तेथून तो पक्का करून भारतात पुन्हा जास्त किमतीला कसा विकला जातो, हे त्यांनी दाखवून दिले. ब्रिटिशांच्या या धोरणामुळे भारतीय उद्योग बंद पडत आहेत. कारागिरांवर बेकारीची वेळ आली आहे. जनता दुःख, दारिद्र्य व उपासमार सहन करीत आहे. रामकृष्ण विश्वनाथ यांनी सर्वप्रथम भारतीयांना स्वदेशीचा मंत्र दिला त्यांनी आपल्या जनतेला असा इशारा दिला की, जनतेने स्वतः भरपूर मेहनत घेऊन भांडवल उभे करावे व त्या पैशातून यंत्र सामग्री विकत घ्यावी किंवा स्वतः तयार करावी आणि यंत्राच्या सहाय्याने कापड , साखर यांचे उत्पादन करावे. एवढेच नव्हे तर, त्यांनी परदेशातील कापड न वापरता, स्वदेशातून तयार झालेले कापडच वापरावे. आपल्या देशात असलेली खनिज संपत्ती शोधून ती बाहेर काढण्यासाठी खाण उद्योग सुरू करावा. या योजनेवर जर भारतात उद्योगधंदे कारखाने सुरू झाले तर, लोकांच्या आर्थिक स्थितीत बरीच सुधारणा होईल व लोक सुखी होतील. १८४३ मध्ये स्वदेशी व बहिष्कारचा पुरस्कार आणि भारताच्या औद्योगिकरणाचा मार्ग दाखवून भारताच्या दारिद्र्यावरीलल उपाय सांगितले.[१]

**दादाभाई नौरोजींचे बालपण व शिक्षण:**

मुंबई येथे एका पारशी कुटुंबात त्यांचा जन्म इ.स. १८२५ मध्ये झाला. लहानपणीच वडील वारल्याने त्यांना शिक्षणासाठी अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. इ.स. १८४५ मध्ये त्यांनी सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. इ.स. १८५० मध्ये ते एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई येथे गणित व भौतिकशास्त्राचे सहप्राध्यापक झाले. इ.स. १८५४ मध्ये तेथेच प्राध्यापक झाले. एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक होणारे ते पहिले भारतीय होते. १८४८ मध्ये मुंबईत एल्फिन्स्टन कॉलेजातील काही विद्यार्थ्यांनी 'ज्ञानप्रसारक सभा' स्थापन केली. दादोबा पांडुरंग तर्खडकर हे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेने ज्ञानप्रसाराचे कार्य हाती घेतले. दादाभाई नौरोजी यांनी या सभेच्या गुजराती शाखेत मोफत विद्यादानाचे कार्य केले. याच सुमारास मुंबईत मुलींची पहिली शाळा काढण्याच्या उपक्रमात त्यांनी सहभाग घेतला. त्यांनी सामाजिक

जागृतीसाठी "रास्तगोफ्तार" हे गुजराती साप्ताहिक इ.स. १८९१ मध्ये सुरू केले. जगन्नाथ शंकर शेठ यांनी २६ ऑगस्ट १८५२ रोजी 'बॉम्बे असोसिएशन' ही संघटना स्थापन केली. या संघटनेच्या स्थापनेत दादाभाईंनी सहभाग घेतला. ही संघटना स्थापन करताना दादाभाईंनी महत्त्वाचे भाषण केले होते. येथूनच त्यांच्या राजकीय कार्याचा आरंभ झाला. त्यांचे प्रेरणा स्थान म्हणजे क्लार्कसन यांनी लिहिलेली 'गुलामाचा व्यापार' व परोपकारी 'हॉवर्डचे चरित्र' हे दोन ग्रंथ वाचले त्यामुळेच त्यांना देशसेवा करण्याची प्रेरणा मिळाली.

**इंग्लंड:**

इ.स. १८५५ मध्ये दादाभाई मुंबई येथील कामा कंपनीच्या कामासाठी इंग्लंडला प्रथमच गेले. तेथे १५ वर्षे राहिले. इंग्लंड मध्ये राहत असताना दादाभाईंनी ब्रिटिश राजसत्तेशी प्रखर वैचारिक झुंज दिली. तसेच प्रथमच भारतातील दारिद्र्य, ब्रिटिशांनी चालवलेले भारताच्या आर्थिक शोषण यांची प्रत्यक्ष आकडेवारी त्यांनी सादर केली. सप्रमाण व साधार असे विस्तृत भारतातील दारिद्र्याचे चित्र मांडले. प्रत्येक वर्षी भारतातून फार मोठी रक्कम इंग्लंडला पाठवली जात असे. भारतातील ब्रिटिश सैन्य, प्रशासनातील अधिकारी, व्यवसायिक यांच्यावर होणाऱ्या खर्चासाठी तीन ते चार कोटी पौंड इतकी रक्कम पाठवले जात असे. भारतातील संपत्ती व साधने यांचे प्रचंड शोषण या निमित्ताने होत असे. भारतीयांसाठी मात्र धनसंचय व भांडवल निर्मितीसाठी कोणतीही संधी दिली जात नव्हती. उद्योगातून मिळणारे फायदे देशवासीयांना मिळत नव्हते. उच्चपदस्थ अधिकारी इंग्रज तर मजूर व कारकून हे भारतातील असत.[२] या काळात त्यांनी ब्रिटिश शासनपद्धती, अर्थव्यवहार आणि व्यापारीनीतीचा अभ्यास केला. याच काळात त्यांच्या मनावर ब्रिटीश उदारमतवादाचा व सनदशीर राजकारणाचा प्रभाव पडला. भारतीय लोकांनी ब्रिटिशांचे व्यापार व उद्योगाचे तंत्र अवगत करून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. दादाभाईंच्या प्रभावामुळे जमशेदजी टाटा यांनी पोलाद कारखाना सुरू केला. कामा कंपनी बुडाल्यावर दादाभाईंनी स्वतःची व्यापारी कंपनी सुरू केली. याच काळात 'ईस्ट इंडिया असोसिएशन' स्थापन केली. भारतीय लोकांचे प्रश्न ब्रिटिश सरकार पुढे मांडणे हा या संघटनेचा हेतू होता. इ. स. १८७० मध्ये दादाभाई इंग्लंडहून परत आले. त्याच वर्षी ते बडोद्याचे दिवाण झाले. परंतु १३ महिन्यात त्यांनी या पदाचा राजीनामा दिला. व ते मुंबईत परत आले. दादाभाईंनी व्यापार आणि उद्योगाच्या क्षेत्रात वावरत असतानाच देशाच्या औद्योगिक, आर्थिक आणि राजकीय स्थितीचा अभ्यास केला. त्यामुळे ब्रिटिश सरकार कोणकोणत्या मार्गाने देशाचे आर्थिक शोषण करीत आहे याची त्यांना जाणीव झाली.

हे आर्थिक शोषण थांबल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही असे त्यांना वाटत होते. इ. स. १८७१ मध्ये भारताच्या उत्पन्न व खर्चाचा विचार करण्यासाठी इंग्लंडला वित्त समिती बसली होती. या समिती पुढे दादाभाईंनी भाषण दिले. इ.स. १८८० मध्ये दुष्काळ समितीला त्यांनी निवेदन दिले. या निवेदनात इ.स. १८९५ मध्ये वेलबी कमिशन पुढे दिलेल्या साक्षीत त्यांनी भारताच्या आर्थिक शोषणाविषयी आपले मत मांडले. ब्रिटिश सरकार तुरुंगातील कैद्यावर दरडोई खर्च करीत असलेल्या रकमेहूनही भारतीय नागरिकांचे वार्षिक उत्पन्न कमी आहे हे दादाभाईंनी साधार सिद्ध केले. व त्यास राजकीय, आर्थिक कारणे आहेत असे सांगून त्यांनी आपला द्रव्यापहरणाचा सिद्धांत मांडला.

**दादाभाईंचा राष्ट्रवाद:**

दादाभाईंनी भारतीय राष्ट्रवादाला अर्थकारणाचा आधार दिला. ब्रिटिश सरकार भारतीय उद्योगधंद्यात भांडवल गुंतवून भारताचे आर्थिक शोषण करीत आहे हे थांबवण्यासाठी भारतीय लोकांनी उद्योगधंद्यात भांडवल गुंतवावे व नवनवीन उद्योगधंदे उभारावेत असा सल्ला त्यांनी भारतीयांना दिला.

भारतीयांच्या आर्थिक शोषणामुळे देश दरिद्री होत चालला आहे आणि ब्रिटन मात्र श्रीमंत होत चालले आहे असेही त्यांनी स्पष्ट मत मांडले. भारताच्या आर्थिक शोषणातच ब्रिटिश सत्तेच्या विनाशाची बीजे रुजलेली आहेत. कारण भारतीय लोक हे आर्थिक शोषण फार काळ चालू देणार नाहीत असा इशारा दादाभाईंनी ब्रिटिश सरकारला दिला.

ब्रिटिश राजवटीत केवळ इंग्लंडचे हितसंबंध सुरक्षित आहेत. भारतीयांची जीवित व मालमत्ता सुरक्षित नाही असे त्यांनी ठणकावून सांगितले. ब्रिटिश राजकारण आणि अर्थकारणाचा निकटचा संबंध आहे. दादाभाईंनीच प्रथम भारतीय लोकांच्या लक्षात आणून दिले. दादाभाईंच्या राजकारणात इंग्रजांच्या न्यायप्रयतेवर पूर्ण विश्वास होता. त्यामुळे सनदशीर व घटनात्मक मार्गाने राजकीय चळवळ चालविण्यावर त्यांनी भर दिला. परंतु या मार्गाने हाती काहीच पडले नाही. हे लक्षात त्यांनी आपल्या ध्येय व धोरणात बदल केला.

इ.स. १९०६ मध्ये कोलकाता कॉंग्रेसच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी 'चळवळ करा, अखंड चळवळ करा' हा मंत्र जनतेला दिला. त्यांच्यातील मवाळ कार्यकर्ता न राहता ते आता जहाल विचारसरणीकडे झुकू लागले. बंगालच्या फाळणीवर टीका करून त्यांनी स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चतु:सुत्रीवर भर दिला. त्यांनी ब्रिटिश सरकारच्या अन्याय धोरणावर टीका केली. त्यामुळेच ते जहाल गटाला इतर जेष्ठ मवाळ नेत्यांपेक्षा जवळचे वाटत. परंतु ते कोणत्याही एका गटाशी एकरूप झालेले नव्हते. त्यांनी मवाळ व जहाल गटातील वैचारिक मतभेद दूर करण्याचा नेहमी प्रयत्न केला. या दोन गटात समन्वय साधून कॉंग्रेसचे ऐक्य कायम टिकवण्यासाठी ते सदैव प्रयत्नशील असत. मवाळ व जहाल गटात ज्या ज्यावेळी मतभेद निर्माण झाले व कॉंग्रेस फुटण्याची शक्यता निर्माण झाली, त्या त्यावेळी दोन्ही गटातील नेते दादाभाईंकडे समन्वयासाठी धाव घेत असत.

इ.स. १९६५ मध्ये लॉर्ड कर्झन यांनी बंगालची फाळणी केल्याने बंगालच्या लोकांनी वंगभंग आंदोलन सुरू केले. दादाभाईंनी या आंदोलनास पाठिंबा दिला आणि त्यांना स्वदेशी व बहिष्काराचे शस्त्र उचलावे असे संदेश दिला. ७ ऑगस्टच्या सभेत बहिष्कारचा सुप्रसिद्ध निर्णय जाहीर करण्यात आला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी सारख्या नेमस्त नेत्यांनी देशाचा दौरा करून लोकांना मँचेस्टरचे सुती कापड व लिव्हरपुलचे मीठ यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले. १६ ऑगस्ट १९०५ रोजी फाळणी प्रत्यक्ष अमलात येईल असे सरकारने १ सप्टेंबर १९०५ रोजी जाहीर केले.[३]

वंगभंग आंदोलनाचे अनुकरण देशातील सर्व जनतेने करावे आणि त्यास त्यांनी न्याय अधिकारासाठी भारतात व इंग्लंड मध्ये चळवळ सुरू करावी असे म्हटले. त्यांनी 'चळवळ करा, चळवळ करा, अखंड चळवळ करा' असाही जनतेला संदेश दिला. स्वराज्य प्राप्तीशिवाय देशाची आर्थिक विपन्नावस्था दूर होणार नाही असे त्यांनी स्पष्ट म्हटले. दादाभाईंनी स्वराज्याची मागणी केली. त्यावेळी जॉन ऑफ सॉलझबरी (इ.स. १११५ -११८०) यांचे एक वचन दादाभाईंनी उद्धृत केले. अन्याय हा सामर्थ्यशाली राजसत्तेला खाली खेचू शकतो. पाशवी शक्ती साम्राज्य निर्माण करतात पण त्या शक्तीने ते टिकवून ठेवता येत नाही.[४] दादाभाई सुरुवातीपासूनच शेवटपर्यंत कॉंग्रेस या संघटनेशी संबंधित राहिले. त्यांनी इंग्लंडमध्ये राहून भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाबाबत ब्रिटिश लोकमत जागृत केले. लंडन येथील कॉंग्रेस समितीमार्फत ते कार्य करीत होते. इ.स. १८९१ मध्ये ते इंग्लंडच्या लिबरल पक्षाचा पाठिंबा मिळवून ब्रिटिश पार्लमेंटवर निवडून गेले. या काळात त्यांनी भारताच्या प्रश्नावर पार्लमेंटचे लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. विविध विचारवंतांनी आप आपली मते मंडळी होती. आर्थिक विचार- अज्ञानामुळे भारतीय व्यक्ती प्रगती करू शकला नाही. त्यामुळे भारतीयांची आर्थिक अवस्था दयनीय झाली. गोपाळरावांनी वृत्तपत्रे आणि साहित्यातून लिहिलेल्या वैचारिक निबंधात जनतेच्या आर्थिक परिस्थितीचे वर्णन केले. भारतीय जनतेला ज्ञान नाही, ज्ञान नाही म्हणून काम नाही, आणि काम नाही म्हणून दाम नाही, पैसा नाही. अशी दयनीय अवस्था अज्ञानामुळे झाली. हे थांबवण्यासाठी शासनाने समाजाच्या आर्थिक परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. मात्र ब्रिटिश शासनाने तरी समाजाची दयनीय आर्थिक अवस्था दूर करण्याचा प्रयत्न करावा. कारण जनतेच्या आर्थिक दिवाळखोरीस सरकारच जबाबदार आहे. असे गोपाळरावांनी इंग्रजांना ठासून सांगितले. [५] तसेच लोकहितवादी यांनी परंपरानिष्ठ समाजावर कठोर टीका केली. त्यांनी लोकहिताच्या तळमळीने आपली जुनी शास्त्रे, रितीरिवाज, यावर टीका करून निद्रिस्त महाराष्ट्रीय समाजाला खळखळून जागे करण्याचे मोलाचे कार्य आपल्या शतपत्रातून केले. समाजाची पुनर्रचना करण्याची निकड अतिशय पोटतिडकीने त्यांनी समाजाच्या गळी उतरविण्यासाठी खटपट केली. म्हणूनच शास्त्रास एकीकडे ठेवा. आपली बुद्धी चालवा आणि ऐहिक सुखाचा मार्ग दाखविणारी पाश्चात्य विद्या व विचार आत्मसात करा असे आवाहन महाराष्ट्रीयन समाजाला त्यांनी आवर्जून केले. देशाच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषणही त्यांनी केले. आर्थिक शोषणावर त्यांनी विदारक प्रकाश टाकला त्यांच्या मारक स्पर्धेला विरोध केला. आणि सर्वांनी असा कट करावा की, जे आपल्या देशात विकेल तेच नेसू, तेच वापरू, असे म्हणून लोकहितवादींनी स्वदेशीचा मंत्र दिला.[६] आणि बॉम्बे गॅझेट या वृत्तपत्रात आठ पत्रे प्रसिद्ध केली. इंग्रज कार्यकर्त्यांना दोषी ठरवले. इंग्रजांनी चालविलेल्या भारताच्या शोषणाबद्दलचा सिद्धांत दादाभाई नौरोजी यांनी मांडला. त्यापूर्वी कितीतरी वर्ष आधी इंग्रज भारतातील संपत्ती लुटून भारताला दरिद्री बनवत असल्याबद्दल भास्करराव तर्खडकरांनी इंग्रजी राजवटीचा धिक्कार केला. राज्यकर्त्यांचा बिलकुल मुलाहिजा न ठेवता फटकळपणे त्यांनी इंग्रजांना बजावले. तुमच्या राज्याचा धिक्कार असो! भारताला आतापर्यंत मिळालेल्या सर्वात मोठा शाप याखेरीज तुमच्या राजवटीत दुसरे काही मानत नाही. भारताची सर्व संपत्ती आता ग्रेट ब्रिटनमध्ये नेण्यात आली आहे आणि आम्हाला रोजगार राहिलेला नाही.[७]

दादाभाईंनी राष्ट्रवादाच्या विकासाला केलेले हे मौलिक योगदान म्हणजे त्यांनी मांडलेला 'आर्थिक शोषणाचा सिद्धांत' हे होय. ज्यावेळी अनेक सुशिक्षित भारतीय ब्रिटिशांच्या भौतिक विकासाने दिपून जाऊन त्यांच्या वैभव संपन्नतेचे गोडवे गात होते. त्याचवेळी राज्यकर्त्यांचे हे वैभव भारताच्या शोषणावर उभारलेले आहे, हे त्यांनी साधार सिद्ध केले. आणि साम्राज्यवादी ब्रिटीश सत्तेने चालवलेल्या अमाप अर्थ शोषनामुळे देशाच्या होत असलेल्या आर्थिक व नैतिक अधोगतीकडे त्यांनी सुशिक्षितांचे लक्ष आकृष्ट केले. त्याबरोबरच हिंदुस्तानच्या राज्यपद्धतीत सुधारणा झाली नाही तर, लवकरच जनतेच्या दारिद्र्यातून एक मोठा दंगा उद्भवेल आणि एक तर ब्रिटिश साम्राज्याचा अंत होईल हिंदुस्थान देश नाम शेष होईल. या अशा जळजळीत शब्दात या आर्थिक शोषणाचे अंतिम परिणाम दाखवून दिले होते. फाळणीचा दिवस 'शोकदिन'- ६ ऑक्टोबर १९०५ रोजी फाळणीची अंमलबजावणी झाली. तो दिवस बंगालमध्ये 'शोकदिन' म्हणून पाळला गेला. एकाही बंगाली घरात त्या दिवशी चुल पेटली नाही. सर्वांनी कडकडीत उपवास केला. लोकांनी मिरवणूक काढल्या. जथ्या-जथ्यानी अनवाणी जाऊन गंगेमध्ये स्नान केले आणि नंतर 'वंदे मातरम' म्हणत सर्वत्र फिरू लागले. लवकरच 'वंदे मातरम' हे गीत उत्स्फूर्तपणे बहिष्कारच्या चळवळीचे घोषणा गीत बनले.[८]

**मूल्यमापन:**

दादाभाई हे काँग्रेसच्या संस्थापकांपैकी एक होते. त्यांच्या साठ वर्षाच्या कार्यकाळात काँग्रेसचा इतिहास प्रतिबिंबित झालेला आहे. त्यांनी कधीही राष्ट्रीय चळवळीकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांनीच ब्रिटिशांशी चालवलेल्या द्रव्यापहरणाचा सिद्धांत प्रथम सादर केला. व राष्ट्रवादाला आर्थिक संदर्भ दिला. त्यांनी आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार केला आणि भारताच्या दारिद्र्याचे शास्त्रीय विश्लेषण करून उपाय सुचविला. दादाभाईंनी आर्थिक दौर्बल्य व राजकीय अन्यायाविरुद्ध लढा दिला. दादाभाई हे भारतीय राष्ट्रवादाचे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी स्वबांधवांना धर्मनिरपेक्षता संघटना व चळवळीची दीक्षा देऊन त्यांना ब्रिटिश सरकार युद्ध उभे केले. त्यांनी सरकारवर टीका करण्यास मागे पुढे पाहिले नाही त्यांच्या महान कार्यामुळेच त्यांच्या काही समकालीन सहकाऱ्यांनी त्यांना 'आधुनिक भारताचे पितामह' उपाधी दिली. लोकमान्य टिळकांनी तर त्यांना 'महर्षी' पदवी दिली.

२१ व्या शतकातील तरुणांनी बारकाईने आपले आर्थिक शोषण कसे होत होते. याचा विचार करावा व नवा मार्ग स्वीकारावा, चिंतन करावे. भारताची समृद्धता वाढवावी. ती टिकवावी. ही दिशा इतरांना पटवून द्यावी.

**तळटीपा व संदर्भग्रंथ:**

1. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : ले. प्रा. वसंत जाधव. विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती १२ ऑक्टोबर २००५, पृ. २१६
2. आधुनिक भारत (१८५७ ते १९५०) : ले. डॉ. एन. एस. तांबोळी, निराली प्रकाशन पुणे, चौथी आवृत्ती. पृ. १.२
3. इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष : मूळ लेखक बिपिनचंद्र. मराठी अनुवाद अनुवाद डॉ. एम. व्ही. काळे. के सागर पब्लिकेशन्स, पुणे. तिसरी आवृत्ती २० फेब्रुवारी २००८ पृ. १४६.
4. आधुनिक भारत (१८५७- १९५९) : कित्ता पृ. १.३
5. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास (इ.स. १८१८ ते १९६०) : ले. डॉ.अनिल कठारे. विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद. तिसरी आवृत्ती, जून २०१५. पृ. १३२
6. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : कित्ता पृ. ६०
7. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास : कित्ता पृ. २१५
8. इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडन्स : कित्ता पृ. १४६